# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१

ई-मेल आयडी :- comscea.pune@maharashtra.gov.in secscea.pune@maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/ड वर्गकृतीकार्यक्रम/मुंबई(३)शहर/प्रा.अ./मान्यता/२०१४/805 दि.१८/११/२०१४.

प्रति,

जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई (३) शहर.

**विषय : 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी/ प्राधिकृत अधिकारी यांची नेमणुक करणेबाबत...**

**संदर्भ :** १. आपले कार्यालयीन फेरप्रस्ताव जा.क्र. जिउनि ३/मुंबई/ ड वर्ग संस्था कृती कार्याक्रम/निरंक/ १४ ,दिनांक १०/११/२०१४.
२. या कार्यालयाकडील नियुक्ती आदेश दिनांक ३१/१०/२०१४.
३. या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. रासनिप्रा/ड वर्ग सह.सं./निवडणुक मा.सु/५५८/२०१४, दिनांक १८/१०/२०१४.
४. मा. सर्वोच न्यायालय, नवी दिल्ली यांच्याकडील एस पी एल (क्रिमिनल) याचिका क्रमांक ६३८२/२००७ मधील आदेश दिनांक १६/०३/२००९.

उपरोकत विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२/- उपरोक्त संदर्भ क्रमांक १ च्या प्रस्तावानुसार या कार्यालयाने संदर्भ क्रमांक २ च्या आदेशाप्रमाणे मुंबई (३) शहर जिल्ह्यातील दिनांक ३१/०३/२०१३ अखेर निवडणूकीस पात्र असलेल्या १०३ सहकारी संस्थांवर नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यापैकी के/प प्रभागातील २४ व एच/प. प्रभागातील ३ सहकारी संस्थांवर प्रशासकानांच प्राधिकृत अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असल्याची बाब या कार्यालयास निर्दशनास आणून संदर्भ क्रमांक २ च्या आदेशाप्रमाणे दिलेल्या नियुक्तीत अंशत: बदल करून संदर्भ क्रमांक १ च्या प्रस्तावाप्रमाणे २७ सहकारी संस्थांवर व नविन एका अशा एकुण २८ सहकारी संस्थांवर प्राधिकृत अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूक करणे बाबत या प्राधिकरणास विनंती केलेली आहे.

याबाबतीत या प्राधिकरणाकडील संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये "ड" वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया राबवीण्याकरीता निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे एखदया सहकारी संस्थावर प्रशासक असल्यास तिच्या निवडणूकीसाठी त्याच प्रशासकाची नियुक्ती करणे उचित होणार नाही. तथापि प्रस्तावातील संस्थांवर प्रशासक असल्याची व त्यांचीच प्राधिकृत अधिकारी म्हणून शिफारस केलेली असल्याची बाब आपल्या कार्यालयाने प्रस्तावात स्पष्टपणे नमुद केलेली नसल्याने या प्राधिकरणाकडील संदर्भ क्रमांक २ च्या आदेशाप्रमाणे संबंधीत प्रशासकांना प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात आलेली आहे.

श्री. उमा नाथ पांडे व इतर विरूध्द स्टेट ऑफ उतर प्रदेश यांच्या याचिकेत मा. सर्वोच्च् न्यायालय, नवी दिल्ली यांनी पारीत केलेल्या संदर्भ क्र. ४ च्या आदेशात अधोरेखित केलेल्या नैसर्गिक न्याय तत्व "nemo judex in causa sua" or "nemo debet esse judex in propria causa sua" व " aliquis non debet esse judex in propria causa quia non potest esse judex at pars" या तत्वांनुसार " no man ought to be a judge in his own case, because he cannot act as judge and at the same time be a Party".

तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीच्या निवडणूका) नियम २०१४ चे नियम क्रमांक १२ च्या परंतुकाप्रमाणे विशिष्ट परिस्थितीत नियुक्त केलेला प्राधिकृत अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्तीत बदल करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास आहेत.

तसेच संदर्भ क्रमांक १ च्या प्रस्तावातील सर्व २८ सहकारी संस्था 'ड' वर्गातील असल्याने सदर संस्थांच्या निवडणुका ह्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७६, महाराष्ट सहकारी संस्था नियम, १९६१ चा नियम ६० मधील तरतुदी अंतर्गत व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) २०१४ मधील नियम ७६ नुसार तसेच संस्थेचे मंजुर उपविधीप्रमाणे पार पाडणे आवश्यक आहे.

सबब या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक २ च्या आदेशातील अ.क्र. २१,२२,३२,८० ते १०३ वरील २७ सहकारी संस्थांवर प्राधिकृत अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून केलेली नियुक्त याद्वारे रद्द करून प्रस्तावातील २८ प्रशासकांपैकी ७ प्रशासकांची प्राधिकृत अधिकारी म्हणून फेर शिफारस केलेली असल्याने सदर सात सहाकारी संस्थांवरील प्रशासकांची नियुक्ती वगळून उर्वरित वीस व एका नविन अशा एकुण ऐकवीस सहकारी संस्थांवर सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** प्रमाणे त्या त्या संस्थांच्या नावासमोर दर्शविलेल्या व्यक्तिंना प्राधिकृत अधिकारी म्हणुन खालील अटी व शर्तीस अधिन राहुन नियुक्ती देण्यात येत आहे.

**तसेच उक्त नियुक्त अधिकारी यांनाच त्या त्या संस्थांच्या नियम ७७ नुसार पदाधिकारी निवडीच्या सभेस प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे.**

१. प्रस्तावात नमुद केलेल्या संस्थांचा प्रस्तावित विशेष साधारण सभेची नोटीस काढण्याचा दिनांक व सभेचा दिनांक यामध्ये नियम ७६ मधील तरतुदीप्रमाणे १५ दिवसांची मुदत असेल याची दक्षता घ्यावी.
२. संस्थेच्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीचा दिनांक १/११/२०१४ नंतरचा असावा.
३. गृहनिर्माण सहकारी संस्थांचे अधिमंडळाचे विशेष बैठकीचा दिनांक शक्यतो रविवार असावा.
४. प्राधिकरणाचे दि.१८/१०/२०१४ रोजीचे 'ड' वर्ग संस्थांचे निवडणुकीबाबतचे सर्वसाधारणपर मार्गदर्शन सुचना तालुका सहकारी निवडणुक अधिकारी/ जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यास अवगत कराव्यात.
५. 'ड' वर्गातील संस्थांव्यतिरिक्त इतर प्रकारच्या संस्थांचा सदर कृती आराखडयामध्ये समावेश झालेला नाही याची खात्री तालुका सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने प्राधिकृत अधिकारी यांना अवगत करणेपुर्वीच करावी.
६. ज्या प्रमाणित लेखापरीक्षकांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नावे सुचविली आहेत, ते नामतालिकेवर असल्याची पुनःश्च खात्री प्राधिकृत अधिकाऱ्याला अवगत करणे पुर्वीच करावी.
७. प्रस्तावीत प्राधिकृत अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी हे त्याच संस्थेचे प्रशासक नसल्याची खात्री करावी.

**सदरचे नियुक्ती आदेश मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने व निर्देशाप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत :** माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव संबंधित सर्व तालुका सहकारी निवडणुक अधिकारी

## परिशिष्ट अ

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणाकडील कार्यालयीन पत्र जा.क्र. रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./मुंबई ३ प्रा.अ./मान्यता/२०१४ दि.     /      /२०१४ चे आदेशासोबतचे परिशिष्ट

| अ. | तालुक्याचे नाव | सहकारी संस्थेचे नाव | विशेष सर्वसाधारण सभेचे अध्यक्षाचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| 1 | एच पश्चिम | सेंट फ्रान्सीस को ऑप हौ सो लि., झेविअर अपार्टमेंट, सेंट जॉन बापटीस्ट रोड, बांद्रा (प), मुंबई ५० | श्री. एस बी गायकवाड, सह.अधिकारी श्रे.२ |
| 2 | एच पश्चिम | पॅरॅगॉन को ऑप हौ सो लि., हिल रोड, शॉपर्स स्टॉप समोर, बांद्रा (प), मुंबई ५० | श्री. एस बी गायकवाड, सह.अधिकारी श्रे.२ |
| 3 | एच पश्चिम | सांताक्रुझ बाळकृष्ण को ऑप्. हौ. सो. लि. सांताक्रुझ (प), मुंबई | श्री उमेद वामन कांबळे, सहकार अधिकारी श्रेणी.१ |
| 4 | के/प विभाग | हिलपार्क बी .२ को आप हौ सो लि | ॲड.निलेश चव्हाण |
| 5 | के/प विभाग | योगा को.ऑप.हौ.सो.लि. प्लॉट नं. १९, १२ वा गुलमोहर कॉस रोड, जेव्हीपीडी स्कीम, मुंबई | श्री.डी.आर. पाटील. सहकारी अधिकारी श्रेणी-१ |
| 6 | के/प विभाग | लक्ष्मीपूजा इंड.प्रिमा.को.ऑप.सो.लि. | ॲड .डी.एम.बटुले |
| 7 | के/प विभाग | मिल्लत नगर को.ऑप.हौ.सो.लि.मिल्लतनगर अंधेरी प मुंबई-५३ | श्री.सतिश काकडे, प्रमाणित लेखापरिक्षक |
| 8 | के/प विभाग | ईस्ट देव सदन को ऑप हौ सो लि | श्रीमती नजमा पटेल,प्रमणित लेखापरिक्षक |
| 9 | के/प विभाग | ग्रीन फिल्ड को ऑप हौ सो लि | श्री.दिपक खांडेकर, सहायक निबंधक |
| 10 | के/प विभाग | स्वीस पॅलेस को.ऑप.हौ.सो.लि. | ॲड.निलेश चव्हाण |
| 11 | के/प विभाग | जूहू बि के को.ऑप.हौ.सो.लि. | श्री.एस.बी.तांदळे, सहकारी अधिकारी श्रेणी-१ |
| 12 | के/प विभाग | न्यु गुरुकृपा को आप हौ सो लि | अभय परळीकर, प्रमाणित लेखापरिक्षक |
| 13 | के/प विभाग | मार्कंड पदमाशाली को आप हौ सो लि | श्री.अशोक लळीत, प्रमाणित लेखापरिक्षक |
| 14 | के/प विभाग | ओकाज शॉपिंग सेंटर प्रिमायसेस | श्री.एस.बी.तांदळे, सहकारी अधिकारी श्रेणी-१ |
| 15 | के/प विभाग | गंगा भवन को ऑप हौ सो लि | श्री.दिपक खांडेकर, सहायक निबंधक |
| 16 | के/प विभाग | वर्षना को आप हौ सो लि | अड .प्रज्ञा वैराळे |
| 17 | के/प विभाग | अवर होम को आप हौ सो लि | श्रीमती जे.ए.निकम सहायक सहकारी अधिकारी |
| 18 | के/प विभाग | शास्त्रीकृपा को आप हौ सो लि | श्री.एस.बी.तांदळे, सहकारी अधिकारी श्रेणी-१ |
| 19 | के/प विभाग | पार्ले लक्ष्मी सदन को आप हौ सो लि | श्री.डी.आर. पाटील. सहकारी अधिकारी श्रेणी-१ |
| 20 | के/प विभाग | सत्यम शिवम सुंदरम युनिट नं. १३ हौ.सोसा.लि | श्री.प्रमोद पडये प्रमाणित लेखापरिक्षक |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| 21 | के/प विभाग | नया दौर को.ऑप.हौ.सो.लि. अंबोली नाका, केवनीपाडा, एस व्ही रोड, जोगेश्वरी (प्), मुंबई | ॲड. श्री.निलेश चव्हाण |

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे